MHPU260017392023

| | |
|---|---|
| दाखल तारीख | – ०२/०५/२०२३ |
| नोंदविल्याची तारीख | – ०२/०५/२०२३ |
| निकाल तारीख | – २४/०२/२०२५ |
| कालावधी | – ०१ व. ०९ म. २२ दि. |

**(भाग – अ)**

## <u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात वडगांव मावळ, पुणे</u>

## (पिठासन अधिकारी :– श्री. रा.ना.चव्हाण )

**नि.फौ.ख.क्र. २१०/२०२३**
**नि.क्र. ४४**

**अभियोगपक्ष** – महाराष्ट्र शासन,
पोलीस स्टेशन अधिकारी,
लोणावळा शहर पोलीस ठाणे, पुणे
(गु.र.नं.२१०/२०२२)

**अभियोगपक्षातर्फे** – सहाय्यक सरकारी अभियोक्ता –
**श्रीमती. मोहोळ**

**–<u>विरुध्द</u>–**

**आरोपी–** १. **सुरज सुरेश देसाई**
वय :– २५ वर्षे, धंदा :– टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स,
२. **स्वप्नील सुरेश देसाई**
वय :– २८ वर्षे, धंदा :– नोकरी,
३. **उषा सुरेश देसाई**
वय :– ६० वर्षे, धंदा :– गृहिणी,
४. **सागर चंद्रकांत देसाई**
वय :– ३१ वर्षे, धंदा :– टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स,

**५. चेतन महेंद्र देसाई**

वय :– २७ वर्षे, धंदा :– हॉटेल,

**६. महेंद्र भिवा देसाई**

वय :– ५० वर्षे, धंदा :– नोकरी,

सर्व रा.समतानगर, वलवण, ता.मावळ, जि.पुणे.

**आरोपींतर्फे विधिज्ञ – श्रीमती. आश्वीनी भोंडवे, श्री.एल.एम.कौशल,**

**(भाग – ब)**

| | |
|---|---|
| **गुन्हा घडल्याची तारीख** | ०७/०१/२०२२ ते ०४/१२/२०२२ |
| **फिर्याद दिल्याची तारीख** | ०४/१२/२०२२ |
| **दोषारोप पत्र दाखल तारीख** | ०२/०५/२०२३ |
| **पुरावा सुरु झाल्याची तारीख** | १३/१२/२०२४ |
| **न्यायनिर्णयासाठी प्रकरण ठेवल्याची तारीख** | २४/०२/२०२५ |
| **न्यायनिर्णयाची तारीख** | २४/०२/२०२५ |
| **आरोपीला शिक्षा ठोठावली असेल तर, त्याची तारीख** | निरंक |

**(आरोपींचे तपशील)**

| आरोपी अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | आरोपीवर ठेवलेले दोषारोप | आरोपीला निर्दोष किंवा दोषी ठरविल्याची तारीख | शिक्षा लादलेला असल्यास | शिक्षा वजावट केल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | **सुरज सुरेश देसाई** | निरंक | निरंक | भा. दं. वि. का. क. ४९८ अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ | निर्दोष ठरविल्याची तारीख २४/०२/२०२५ | निरंक | निरंक |
| ०२. | **स्वप्नील सुरेश देसाई** | | | | | | |
| ०३. | **उषा सुरेश देसाई** | | | | | | |
| ०४. | **सागर चंद्रकांत देसाई** | | | | | | |
| ०५. | **चेतन महेंद्र देसाई** | | | | | | |
| ०६. | **महेंद्र भिवा देसाई** | | | | | | |

**(भाग – क)**

**(अभियोगपक्षातर्फे साक्षीदारांची यादी)**

| **साक्षीदाराचे अ.क्र.** | **नाव** | **पुराव्याचा तपशील** |
|---|---|---|
| अ.सा.क्र.०१ | प्रज्ञा सुरज देसाई | नि.४१ |

**आरोपीतर्फे तोंडी पुरावा देण्यात आलेला नाही.**

**(फिर्यादीतर्फे पुरावा निशाणी क्रमांक यादी)**

| **अ.क्र.** | **तपशील** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|
| ०१ | तक्रारीवरील सही | नि.क्र.४२ |

**आरोपीतर्फे लेखी पुरावा देण्यात आलेला नाही.**

# न्यायनिर्णय

(घोषित दिनांक २४/०२/२०२५)

**०१.** प्रस्तुतच्या खटल्यामध्ये आरोपी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ साठीच्या संपरिक्षेस सामोरे गेलेले आहेत.

**०२. अभियोगपक्षाचे घटनेविषयीचे कथन खालीलप्रमाणे आहे–**

दिनांक ०७/०१/२०२२ ते ०४/१२/२०२२ रोजी पर्यंत मौजे. समतानगर, वलवण गावचे हद्दीत तक्रारदार याचे राहते घरात सर्व आरोपींनी तक्रारदाराला तु प्रेमविवाह केला, तु आमच्या घराचे लायकीची नाही, या कारणावरुन वेळोवेळी जाचहाट करुन हाताने मारहाण करुन शारीरिक व मानसीक छळ करुन उपाशी पोटी ठेवुन शिवीगाळ केली, म्हणून तक्रारदाराने आरोपींविरुध्द लोणावळा शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

**०३.** तक्रारदाराच्या तक्रारीवरुन गु.र.नं.२१०/२०२२ नोंदविण्यात आला. ज्याचा तपास तपासी अंमलदार श्री.एस.एम.शेख, पोलिस हवलदार, लोणावळा शहर पोलिस ठाणे यांनी करुन, आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करणे इतपत पुरावा मिळून आल्याने, न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले.

**०४.** सदर प्रकरणात आरोपींनी हजर होवून, त्यांचा जामीन दिला, आरोपींवरील दोषारोप त्यांना वाचून व समजावून सांगितले, ते त्यांनी नाकबूल करुन, संपरीक्षेस सामोरे जाण्याची विनंती केल्याने आरोपींविरुध्द दोषारोप निश्चित करण्यात आले.

**०५.** आरोपींनी त्यांचेविरुध्द खोटा गुन्हा दाखल केलेला आहे, असा बचाव घेतलेला आहे.

०६. आरोपींविरुध्दचे दोषारोप आणि अभीलेखावरील दस्ताऐवज यावरुन सदर प्रकरणाच्या न्यायनिवाडयाकामी खालील मुद्दे निश्चित करण्यात आले असून कारणमिमांसेअंती त्यावरील निष्कर्ष त्या मुद्दयांसमोर देण्यात आलेले आहे.

| अ.नु. | मुद्दे | उत्तरे |
|---|---|---|
| ०१ | अभियोगपक्षाने असे शाबीत केले का की, दिनांक ०७/०१/२०२२ ते ०४/१२/२०२२ रोजी पर्यंत मौजे. समतानगर, वलवण येथील तक्रारदार यांचे राहते घरात आरोपींनी संगनमताने वेळोवेळी तक्रारदार हिस तु प्रेमविवाह केला, तु आमच्या घराचे लायकीची नाही, असे म्हणुन शारीरिक व मानसिक छळ केला आणि भा.द.वि. कलम ४९८–अ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला? | **नकारार्थी** |
| ०२ | अभियोगपक्षाने असे शाबीत केले का की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन, तक्रारदाराला हाताने मारहाण करुन इच्छापूर्वक किरकोळ दुखापत केली व त्याद्वारे भा.द.वी. कलम ३२३ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| ०३ | अभियोगपक्षाने असे शाबीत केले का की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन तक्रारदार यांना शिवीगाळ केली व त्याद्वारे भा.द.वि चे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| ०४ | अभियोगपक्षाने असे शाबीत केले का की, वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन दमदाटी करुन धमकी दिली व त्याद्वारे भा.दं.वि. कलम ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| **०५** | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

**०७.** सदर प्रकरणामध्ये, अभियोगपक्षातर्फे, आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्याकरिता एकमेव साक्षीदार म्हणजेच स्वतः तक्रारदार याकामी तपासण्यात आली. तसेच आरोपींविरुध्द प्रत्यक्ष गुन्हयाशी संबंधीत पुरावा उपलब्ध नसल्यामुळे, निशाणी क्र.०१ वरील सविस्तर आदेशाने आरोपींचा फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ३१३ अन्वयेचा जबाब नोंदविण्याचे वगळण्यात आले आहे.

## <u>मुद्दा क्र.०१ ते ०४ करिता</u>

**०८.** सदरचे सर्व मुद्दे हे एकमेकांवर अवलंबून असल्याने कारणमिमांसेची पुनरावृत्ती टाळण्याकरता त्यांना एकत्रीत घेण्यात येत आहे.

**०९.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेला साक्षीदार प्रज्ञा सुरज देसाई हिने तिच्या सरतपासात असे नमुद केलेले आहे की, आरोपी क्र. ०१ हे त्यांचे पती तर आरोपी क्र. ०२ ते ०६ हे त्यांचे दीर व सासु–सासरे आहेत. आरोपी क्र.१ सोबत त्यांचा प्रेमविवाह झाला असल्याने त्यांच्या पतीचे घरचे लोक विरोधात होते. त्यामुळे तक्रारदार व तिच्या पतीचे भांडण झाले व तक्रारदार तिच्या पतीपासुन वेगळी झाली. त्यामुळे तिने तक्रार दाखल केली होती. तिने तक्रारीवरील सही ओळखली. सदर तक्रारीतील मजकुर वाचुन दाखविला असता, तिने तो नाकारलेला आहे. तसेच तक्रारीमध्ये काय मजकुर नमुद केला होता, हे तिला वाचुन दाखविला नव्हता, असेही नमुद केलेले आहे.

**१०.** या साक्षीदाराचा अभियोग पक्षाच्या वतीने उलटतपास घेण्यात आला, ज्यामध्ये तिने तिच्या तक्रारीमधील अधोरेखांकित भाग 'अ' नाकारलेला असुन, आरोपी व तिचा घटस्फोट झालेला आहे. तसेच आरोपींचे विधिज्ञांनी आरोपीतर्फे उलटतपास घेतला असता तिने असे असे कथन केलेले आहे की, आरोपीविरुध्द तिची तक्रारच नाही, तिला आरोपीविरुध्द प्रकरण चालवायचे चालवायचे नसुन कुठलाही साक्षीदार तपासावयाचा नाही.

**११.** त्याचप्रमाणे तक्रारदार हिने तिच्या निशाणी क्र.४३ वरील सहीने सहाय्यक सरकारी अभियोगामार्फत अभियोगपक्षाचा पुरावा बंदची पुरशिस बंद केलेली आहे. सदर परिस्थितीमध्ये न्यायपटलावर आलेल्या संपुर्ण तपासावर अवलोकन केले असता, आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेले कोणतेही दोषारोप सिध्द होत नाही. सबब मुद्दा क्र.०१ ते ०४ निष्कर्ष चे नकारार्थी देण्यात येत असुन, मुद्दा क्र.०५ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

## आदेश

| | |
|---|---|
| ०१ | **आरोपी क्र.१ सुरज सुरेश देसाई, आरोपी क्र.२ स्वप्नील सुरेश देसाई, आरोपी क्र.३ उषा सुरेश देसाई, आरोपी क्र.४ सागर चंद्रकांत देसाई, आरोपी क्र.५ चेतन महेंद्र देसाई, आरोपी क्र.६ महेंद्र भिवा देसाई** यांना सदर खटल्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४९८ अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणेच्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| ०२ | आरोपींचे जामीन कदबे रद्द करण्यात येत असून, जामीनदाराचा जामीन जामीन–जोखीम संपविण्यात येत आहे. |
| ०३ | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ अ प्रमाणे अपील कालावधी पुढील सहा महीन्याकरता आरोपींनी वैयक्तिक व जामीनदाराचा प्रत्येकी रु.१५,०००/– (रुपये पंधरा हजार मात्र) जातमुचलका सादर करावा. |

| | |
|---|---|
| **०४** | न्यायनिर्णय – आदेश मुळ तक्रारदारास कळविण्याकरीता मा. जिल्हाधिकारी, पुणे यांच्यामार्फत ई–मेल द्वारे पाठविण्यात यावा. |

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात संगणकावर टंकलिखीत व घोषीत करण्यात आला.)**

RAMCHANDRA NARAYANSA CHAVAN

Digitally signed by RAMCHANDRA NARAYANSA CHAVAN
Date: 2025.02.27 18:07:59 +0530

(रा.ना.चव्हाण)

दि.२४/०२/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग

वडगाव मावळ वडगाव मावळ न्यायालय, पुणे

**CERTIFICATE**

I affirms that the contents of this P.D.F file judgment/order are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | A. S. Sonwane (Grade III) |
| Court Name | : | Shri. R.N. Chavan, Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Vadgaon Maval, Pune |
| Date of Judgment | : | 24/02/2025 |
| Judgment signed by P.O. on | : | 27/02/2025 |
| Judgment uploaded on | : | 27/02/2025 |